# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.३१ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १२७ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 31 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 127 • Pages 4 • Rate 4 Rs


## रामदास आठवलेंचा मुंबईत 'राजकीय बॉम्ब'

**मुंबई**–मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटत असतानाच, महायुतीमधील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' आठवले गटाने बंडाचे निशाण फडकवले आहे. भाजप आणि शिवसेनेने (शिंदे गट) आमच्याशी विश्वासघात केला आहे, असा घणाघाती आरोप करत रामदास आठवले यांनी मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली. रिपाईने आज ३९ उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून, मुंबईत दलित मतांच्या विभाजनामुळे भाजप-शिंदे सेनेची डोकेदुखी वाढणार आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महायुतीच्या नेत्यांनी रिपाइंला ७ जागा देण्याचे आश्वासन दिले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री स्तरावर चर्चाही झाली होती. मात्र, भाजपने १३७ आणि शिवसेनेने ९०जागांची घोषणा केली, पण या यादीत रिपाईच्या एकाही उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यात आले नाही. अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही महायुतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने रामदास आठवले यांनी आक्रमक पवित्रा घेत, आपल्या पक्षाच्या ३९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

# 'ब्रँड' ची भाषा करणाऱ्यांचा महापालिकेत 'बँड' वाजणार

## डोंबिवलीच्या विजय निर्धार सभेत एकनाथ शिंदेंची ठाकरे बंधूंच्या युतीवर बोचरी टीका



दैनिक वादळ वाता

**डोंबिवली (वृत्तसंस्था)**

जे केवळ 'ब्रँड-ब्रँड' अशी भाषा करत आहेत, त्यांचा महापालिका निवडणुकीत जनता बँड वाजवल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य युतीवर नाव न घेता बोचरी टीका केली. डोंबिवली पश्चिमेच्या सम्राट चौकात आयोजित विजय निर्धार सभेमध्ये ते बोलत होते.महायुतीत जागा वाटपावरून अनेक चर्चा सुरू आहेत. कार्यकर्त्यांच्या मनात असलेल्या जागा वाटपाच्या शंकांचे निरसन करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महायुतीचा फॉर्म्युला ठरला असून चर्चा अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी आमची सकारात्मक चर्चा सुरू आहे. त्यामुळे बाहेर काय चर्चा सुरू आहेत, याकडे लक्ष न देता कामाला लागा असे आवाहन शिवसैनिकांना केले.लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील यशाचा पाढा वाचताना शिंदे म्हणाले की, राज्यात सर्वत्र महायुतीचा भगवा फडकला आहे. नगरपरिषदांमध्येही जनतेने आम्हालाच कौल दिला असून, आगामी महापालिका निवडणुकीतही महायुतीचाच भगवा फडकणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. आम्ही बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असून 'बोलण्यापेक्षा काम करण्यावर आमचा भर असतो,' असेही त्यांनी ठणकावून सांगितले. यावेळी बोलताना त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कामाची मुक्तकंठाने स्तुती केली. या सभेमुळे डोंबिवलीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आगामी महापालिका निवडणुकीसाठी महायुतीने आतापासूनच कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे.



### महायुतीत मिठाचा खडा टाकू नका

**कल्याण डोंबिवलीत भाजपचाच महापौर होईल. भाजपाने स्वबळावर लढावे अशी वक्तव्य गेल्या अनेक दिवसांपासून भाजपाचे पदाधिकारी करीत आहेत. महायुतीविरोधात वक्तव्ये करणाऱ्यांना खासदार श्रीकांत शिंदे यांनी खडे बोल सुनावले. शिंदे म्हणाले की, डोंबिवली हा सुरुवातीपासूनच महायुतीचा, हिंदुत्वाचा बालेकिल्ला राहिला असून कोणीही त्या महायुतीमध्ये मिठाचा खडा टाकण्याचे काम करू नये. यावेळी त्यांनी मतदारसंघातील विकासकामांची जंत्री वाचून दाखवण्यासह विरोधकांचा समाचार घेतला.**

# केज येथे शौर्य दिनानिमित्त भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम

## प्रसिद्ध गायक अजय देहाडे यांची सादरीकरणे

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील महात्मा फुले नगर येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनाच्या औचित्याने भव्य भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार असून प्रसिद्ध भीमगीत गायक अजय देहाडे आपल्या प्रभावी आवाजात ज्वलंत, प्रेरणादायी भीमगीते सादर करणार आहेत.

हा कार्यक्रम निपुण प्रतिष्ठान, डऋउ ग्रुप आणि मिलींद सागर युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी अंश सिरसट, पियुष काळे, निखिल समुद्रे, निहार भालेराव, केतन घोडके, सिद्धार्थ जोगदंड, यश सिरसट, ऋषिकेश सोनवणे व अनिकेत समुद्रे आदी युवक परिश्रम घेत आहेत.

या कार्यक्रमामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व शौर्य दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात येणार असून सामाजिक बांधिलकी, बंधुता आणि समानतेचा संदेश देणारी विविध गीतं प्रेक्षकांसमोर सादर केली जाणार आहेत. कार्यक्रमाचे स्थळ महात्मा फुले नगर येथे खास सजविण्यात येत असून आवश्यक सर्व नियोजन पूर्ण झाले आहे.

आयोजकांनी माहिती देताना सांगितले की, हा




कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. शौर्य दिन हा इतिहासातील प्रेरणादायी दिवस असून त्यातून समता, न्याय आणि स्वाभिमानाचा संदेश दिला जातो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक युवक तसेच सामाजिक बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. भीमगीतांच्या माध्यमातून प्रेरणादायी वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बाजार करून घरी परतताना पाय घसरून दरीत कोसळल्याने ४७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील दहेल (सोलाबारीपाडा) येथील एक व्यक्ती मोलगी येथून बाजार करून घरी परतत असताना, डोंगरावरून पाय घसरून दरीत कोसळल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली असून, पारशी सेदा वळवी (वय ४७) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पारशी वळवी हे रविवारी मोलगी येथे बाजार करण्यासाठी गेले होते. बाजार आटोपून ते पायी दहेल गावाकडे परतत होते. रात्री ७ वाजेच्या सुमारास, आपल्या घरापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर असलेल्या एका उंच टेकडीवरून चालताना त्यांचा अचानक पाय घसरला आणि ते खोल दरीत कोसळले.डोंगरदऱ्यांचा परिसर आणि अंधार असल्याने या अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांनी तातडीने शोध मोहीम राबवली. त्यांना दरीतून बाहेर काढून मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डोक्याला आणि शरीराच्या अन्य भागांना गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

या घटनेबाबत मयताचा मुलगा दिलीप पारशी वळवी याने मोलगी पोलीस ठाण्यात माहिती दिली. डोंगरदऱ्यांचा दुर्गम भाग आणि रात्रीची वेळ असल्याने खबर देण्यास उशीर झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी मोलगी पोलिसांनी अकस्मात मृत्यू (अ.मृ. रजि. ४१/२०२५) म्हणून नोंद केली आहे. या घटनेबाबत कुटुंबीयांनी कोणाबद्दलही संशय व्यक्त केलेला नाही.

पुढील तपास महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल मंगला पाडवी आणि पोलीस हवालदार अरुण सूर्यवंशी करत आहेत. या घटनेमुळे दहेल परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गेवराई नगर परिषद नगरध्यक्षपदी गीताभाभी बाळराजे पवार यांची निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ उत्साहात पार पडला

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषद नगर अध्यक्षपदी गीता भाभी बाळराजे पवार यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी धानोरा जळगाव डीग्रस मार्फत आयोजित सत्कार समारंभ उत्साहात पार पडला व पुढील होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक संदर्भात मा.बाळराजे दादा पवार यांनी पुढील दिशा कशी असेल या संदर्भात चर्चा करण्यात आली व यापुढे बीडच्या



पंडिताना कधीच गुलाल लागून देणार नाही अशी ग्वाही त्याप्रसंगी बाळराजे दादा यांनी दिली. तसेच जनतेच्या सुख. दुःखात आम्ही खंबीरपणे सोबत आहोत असा विश्वास त्या ठिकाणी देण्यात आला.या प्रसंगी उपस्थित धानोरा जळगाव डिग्रस ग्रामपंचायत चे माजी सरपंच सूर्यकांत शिंदे, विजय खुणे,युवा नेते योगेश खुणे, गणेश शिंदे,ऋषिकेश खुणे, शशिकांत खुणे,अमोल कांबळे, चंद्रशेखर गीलबिले, अरविंद खुणे, नवनाथ शिंदे,समाधान सावंत ,राहुल शिंदे,नवनाथ खुणे, जळगाव येथील पंडित इदगे ,ग्रामपंचायत सदस्य नारायणराव खुणे ,मधुसूदन खुणे ,गोविंद खुणे परमेश्वर इदगे ,संजय इदगे, सुरेंद्र इदगे आदी उपस्थितीत होते.

## वादळी कट्टा

### गरीबीचे श्रीमंत शिक्षण

फाटकी चप्पल, अर्धे पोट,  
पावसात भिजलेलं अंग,  
तरीही डोळ्यांत मोठी स्वप्नं,  
आणि मनामध्ये लोखंडी दंग.  
चिखलाने माखलेले रस्ते,  
तरी शाळेकडेच पाऊल वळे,  
भुकेच्या विरुद्ध लढत-लढत  
ज्ञानाचा दिवा हातात जळे.  
आईच्या ओल्या पदरातून  
घास निम्मा माझ्याकडे वळतो,  
शिक रे बाळा, बदल घडव  
असा तिच्या नजरेतला आवाज वळतो.  
दिवा नाही, वीज नाही,  
चुलीवरच्या धुरात अभ्यास,  
तेवढ्याच प्रकाशात लिहीत-लिहीत  
घडत जातो जीवनाचा सुवर्ण सुवास.  
श्रीमंती पैशात नाही रे,  
ती असते विचारांच्या खजिन्यात,  
गरीबी देऊन जाते बळ  
उभं राहण्याचं प्रत्येक क्षणात.

**–संपादक,अजय भांगे**

# साई संस्थान एम्पलॉइज सोसायटी कर्मचारी गाढवे यांच्या प्रामाणिकपणा मुळे सोसायटीच्या वतीने सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी श्री साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटी कर्मचारी सुनील गाढवे साई आश्रम भक्त निवास (१०००) रूम येथे ड्युटी करीत असताना झेरॉक्स दुकानासमोर अज्ञात साई भक्ताचे दोन हजार रुपये सापडले त्यांनी ते प्रामाणिक पणे साई आश्रम भक्तनिवास १००० रूम सुपरवायझर व संचालक मिलिंद दुनबळे यांच्याकडे जमा केले त्यावेळी धनराज चितळकर सुपरवायझर विक्रम चौधरी उपस्थित होते या प्रामाणिकपणामुळे साई संस्थान एम्पलॉइज सोसायटी चे चेअरमन विठ्ठलराव पवार व व्हाईस चेअरमन पोपटराव कोते व संचालक मंडळ व सचिव विलासराव वाणी व सहसचिव बाबासाहेब अनार्थे व संभाजी कोते संस्थान कर्मचारी व सोसायटी कर्मचारी यांनी त्यांच्या प्रामाणिकपणे मुळे अभिनंदन केले.



यावेळी चेअरमन विठ्ठल तुकाराम पवार पा, व्हा. चेअरमन पोपटराव भास्करराव कोते पा. संचालक महादु बापुसाहेब कांदळकर, कृष्णा नाथा आरणे, भाऊसाहेब चांगदेव कोकाटे पा., संभाजी शिवाजी तुरकणे पा., देविदास विश्वनाथ जगताप, विनोद गोवर्धन कोते पा., मिलींद यशवंत दुनबळे, तुळशिराम रावसाहेब पवार पा., रविंद्र बाबु गायकवाड, भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे पा., इकबाल फकिरमहंमद तांबोळी, सौ सुनंदा किसन जगताप पा., सौ. लता मधुकर बारसे पा., रंभाजी काशिनाथ गागरे, भाऊसाहेब भानुदास लबडे पा., सचिव विलास गोरखनाथ वाणी पा. सह सचिव बाबासाहेब शंकर अनर्थे पा., सहाय्यक सह सचिव संभाजी सोपान कोते पा. व कर्मचारी वर्ग उपस्थित होते

# जागर प्रतिष्ठानचा जिल्हा मेळावा संपन्न

## गडकोट विकास महामंडळासाठी किसन पाटलांचा एल्गार

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पाथरूड या ठिकाणी श्री संत सावता बाबा मंगल कार्यालय मध्ये जागर प्रतिष्ठान संघटनेचा बीड जिल्हास्तरीय मेळावा संपन्न झाला यावेळी माजलगाव गेवराई वडवणी व धारूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



जागर प्रतिष्ठान संघटना गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र मध्ये विविध सामाजिक विषयावर व गड किल्ले संवर्धनावर कार्यरत आहे संघटनेची सोळा हून अधिक जिल्ह्यामध्ये मजबूत बांधणी आहे बीड जिल्ह्याच्या पदाधिकारी यांची बैठक पार पडली या बैठकीतून संघटनेचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी गड किल्ल्याच्या संवर्धनासाठी गडकोट विकास महामंडळ स्थापनेचा लढा तीव्र करण्यासाठी संघटनेला साथ द्या असे आवाहन उपस्थित शिलेदारांना केले त्या बैठकीला जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण,दत्ता भाऊ आघव, सचिन बिडवे, घनश्याम दादा भुतडा, विष्णू नाना जाधव, संतोष घुबडे, गणेश लव्हाळे, आप्पासाहेब तर, अशोक दादा गव्हाणे ,अमित गिरी, रामदास बनकर,नवनाथ चालक,अनिल आवड,तुषार गायकवाड, ल्हिाध्यक्ष अशोक आगे, आदिनाथ शिंदे, राहुल तांबे, प्रणव अवताडे, अतुल नरवडे, गणेश बोराडे, माऊली राऊत, पप्पू मुंडे, भीमा ताटे, माऊली नाटकर, प्रवीण चिंचणी, गणेश राऊत,अक्षय मोरे ,रणजित शिंदे ,राम शिंदे,अक्षय चोरगे,मोहन कोळसे यांच्या सह शेकडो शिलेदार उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन बिडवे यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाच्या आयोजक जागर प्रतिष्ठानच्या शिलेदार विशाल जाधव यांनी केले.

# बंदरांच्या आधुनिकीकरणातून अर्थशक्तीचा उदय

भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. समुद्र हा भारताच्या व्यापाराचा जीवनमार्ग आहे. कच्चे तेल आणि कोळशापासून इलेक्ट्रॉनिक्स, कापड आणि कृषी उत्पादनांपर्यंत देशाच्या आयात आणि निर्यातीचा मोठा भाग व्यस्त बंदरांमधून जातो. जागतिकीकरणामुळे पुरवठा साखळ्यांमध्ये खोलवर परस्परावलंबन निर्माण झाले असून भारत एक प्रमुख उत्पादन आणि ऊर्जा केंद्र म्हणून उदयास आला आहे.

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरिटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लॉंच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे आणि क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता 'एमआयव्ही २०२०' हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. कामकाजात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो. भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने 'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एमएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे. सरकार आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे. जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलीकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाइड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय सहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खर्चाशी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाइन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.ईशान्य भारतातील अंतर्देशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लँडस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृत कल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. 'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी सुमारे ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.

# नंदुरबार रेल्वे स्थानकाच्या विकासकामांची खा.गोवाल पाडवी व माजी मंत्री के.सी.पाडवी यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी; मंदिर पुनर्स्थापनेचा प्रश्न मार्गी लावणार

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार रेल्वे स्थानकाचा 'अमृत भारत स्थानक' योजनेअंतर्गत कायापालट होत असून, सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी दिनांक ३० रोजी खा. गोवाल पाडवी आणि माजी मंत्री के. सी. पाडवी यांनी विशेष पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी स्थानकावरील नवीन इमारत, लिफ्ट आणि इतर तांत्रिक कामांची बारकाईने पाहणी केली व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली.

काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाकडून स्थानक परिसरातील जुने साईबाबा मंदिर हटवण्यात आले होते. या निर्णयामुळे स्थानिक भाविकांमध्ये तीव्र नाराजी होती. ह्या भेटीदरम्यान नागरिकांनी गोवाल पाडवी व के. सी. पाडवी यांच्याकडे आपल्या व्यथा मांडल्या. नागरिकांच्या धार्मिक भावनांचा सन्मान राखत, सदर मंदिर त्याच ठिकाणी पुन्हा उभारण्यात यावे किंवा योग्य पर्यायी जागा देऊन त्याचे सन्मानपूर्वक स्थलांतर करण्यात यावे, अशी आग्रही विनंती त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केली. यावर प्रशासनाने सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे.

केंद्र सरकारच्या 'अमृत भारत स्थानक' योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा खा.गोवाल पाडवी यांनी आढावा घेतला. त्यात प्रवाशांच्या सोयीसाठी बांधण्यात येत असलेली नवीन इमारत आणि वृद्ध-दिव्यांगांसाठी प्रस्तावित लिफ्टचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.तसेच स्थानक परिसरातील नव्या गेटच्या कामाची प्रगती आणि ते पूर्ण होण्याचा कालावधी याबाबत त्यांनी तांत्रिक माहिती घेतली.

रेल्वे स्थानकाचा विकास हा केवळ भौतिक नसून तो लोकभावनेचा आदर करणारा असावा. रखडलेली कामे निर्धारित वेळेत पूर्ण झाल्यास प्रवाशांची मोठी सोय होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी आगामी काळातही रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी रेल्वेचे वरिष्ठ अभियंता, तांत्रिक अधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मृत्यूचा 'रिव्हर्स' गिअर! विसरवाडीत रोड रोलरच्या धडकेत दोन तरुण ठार; ठेकेदाराच्या निष्काळजीपणाचा दोन कुटुंबांना फटका

दैनिक वादळ वार्ता

**नवापूर | मोहसीन शेख**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर सोमवारी दुपारी अंगावर शहारे आणणारी भीषण दुर्घटना घडली. विसरवाडी जवळील 'अपना हॉटेल' परिसरात रस्ते कामावरील एका विना नंबर प्लेटच्या रोड रोलरने अचानक रिव्हर्स घेतल्याने झालेल्या अपघातात दोन १७ वर्षीय तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. कंत्राटदाराने सुरक्षेचे सर्व नियम धाब्यावर बसवल्याने हे निष्पाप बळी गेल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.



**नेमकं काय घडलं?**

सोमवारी दुपारी २:३० च्या सुमारास अमित जयंत गावीत, अक्षय अशोक वसावे आणि तनिष संदीप वसावे हे तीन तरुण मोटारसायकलने (क्रमांक. चक,३९,-ड,०१०२) विसरवाडीकडून नवापूरकडे जात होते. महामार्गावर काम सुरू असताना एका रोड रोलर चालकाने कोणतीही पूर्वसूचना किंवा सिग्नल न देता वाहन अचानक मागे (रिव्हर्स) घेतले. दुचाकीस्वाराला याचा अंदाज न आल्याने दुचाकी थेट लोखंडी रोलरखाली आदळली. या भीषण धडकेत अमित जयंत गावीत (वय १७, राहणार. गंगापूर) याचा जागीच मृत्यू झाला. तर अक्षय अशोक वसावे (वय १७, राहणार अंन्टीपाडा) याचा नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. तनिष वसावे हा तरुण सध्या मृत्यूशी झुंज देत असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

अपघाताची भीषणता पाहून परिसरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच रस्ते अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी नेहमी तत्पर असणाऱ्या 'नाळीज धाम' रुग्णवाहिकेचे चालक सुरेश वसावे यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने जखमींना रुग्णालयात हलवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. नागरिकांनी त्यांच्या या तत्परतेचे कौतुक केले असले, तरी अपघातानंतर मदतीपेक्षा अपघात होऊच नयेत अशी व्यवस्था प्रशासनाने का केली नाही? असा सवालही उपस्थित केला आहे.

महामार्गावर काम सुरू असताना बॅरिकेड्स, सूचना फलक, रिफ्लेक्टर किंवा सुरक्षेसाठी फ्लॅगमॅन असणे अनिवार्य आहे. मात्र, या ठिकाणी यातील कोणतीही व्यवस्था नव्हती. विशेष म्हणजे, अपघातग्रस्त रोड रोलरला नंबर प्लेटही नव्हती. ठेकेदाराच्या या बेजबाबदारपणामुळे दोन हसती-खेळती कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. फिर्यादी जयंत रोतु गावीत यांच्या तक्रारीवरून विसरवाडी पोलिसांनी अज्ञात रोलर चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५ आणि मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल सुरेश मोरे पुढील तपास करत आहेत.

# नंदुरबार पोलिसांची मोठी कारवाई: लग्न समारंभात वऱ्हाड्यांच्या वेशात चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

लग्न समारंभातील गर्दीचा फायदा घेऊन, पाहुण्यांसारखी वेशभूषा करून चोऱ्या करणाऱ्या मध्यप्रदेशातील एका सराईत आंतरराज्यीय टोळीला जेरबंद करण्यात नंदुरबार पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ४ आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून २ लाख २० हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी नंदुरबार शहरातील हॉटेल पीजी सन्स येथे पारसनाथ जयस्वाल यांच्या परिवारातील लग्न सोहळा सुरू होता. या गर्दीत काही अज्ञात इसमांनी वऱ्हाड्यांप्रमाणे कपडे घालून प्रवेश केला आणि दागिने, रोख रक्कम व मोबाईल असलेली बॅग लंपास केली. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू केला. ही चोरी मध्यप्रदेशातील राजगड जिल्ह्यातील गुन्हेगारांनी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून ४ संशयीतांना ताब्यात घेतले. त्यात बादल कृष्णा सिसोदिया (२४ वर्षे) काला ऊर्फ हतिक महेश सिसोदीया (२२ वर्षे) दिपक दिलीप सिसोदीया (२९ वर्षे) जसवंत मनीलाल सिसादिया (२७ वर्षे) (सर्व रा. जि. राजगड, मध्यप्रदेश) संशयीतांना गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २,२०,८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हे आरोपी अत्यंत सराईत असून ते विविध राज्यांत फिरून लग्नसमारंभ, बँकांचे परिसर आणि सराफ बाजार या ठिकाणी पाळत ठेवतात. कोणाचेही लक्ष नसल्याची खात्री होताच ते मौल्यवान ऐवज चोरून पसार होतात. वरील यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, हेमंतकुमार पाटील आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

### पोलीस प्रशासनाचे आवाहन

**नागरिकांनी लग्नकार्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी जाताना आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी. आजूबाजूला संशयास्पद व्यक्ती आढळल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्षाला कळवावे.**


**- जिल्हा पोलीस दल, नंदुरबार**



# फुलकोबी योग्य प्रकारे स्वच्छ कशी करायची?

दैनिक वादळ वार्ता

हिवाळ्यात अशा अनेक प्रकारच्या हंगामी भाज्या आहेत ज्या खाण्यास केवळ स्वादिष्टच नसतात, तर आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर असतात. यापैकी एक म्हणजे फुलकोबी. थंडीचा हंगाम सुरू होताच बाजारात आणि गाड्यांमध्ये सर्वत्र फुलकोबी दिसू लागते. बरेच लोक ते भाजी बनवून खातात, तर काहींना कोबीची भजी आणि पराठे खूप आवडतात. पण या वेळी सर्वात मोठी समस्या म्हणजे कोबीमध्ये जंत असणे. अनेकदा कोबी बाहेरून स्वच्छ दिसते, पण कापल्यावर आतून किडे बाहेर पडतात. अशा परिस्थितीत, मनात एकच प्रश्न येतो की 'मी किडे असलेल्या फुलकोबीची ओळख कशी करू?'. यामुळे, आज आम्ही तुम्हाला काही सोप्या टिप्स आणि ट्रिक्स सांगणार आहोत ज्याच्या मदतीने आपण कोबी खरेदी करण्यापूर्वी काही मिनिटांत कोबीमधील कीटक शोधू शकता.



फुलकोबी ही केवळ चविष्ट भाजी नसून आरोग्यासाठी अत्यंत पोषक मानली जाते. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के आणि फायबरचे प्रमाण भरपूर असते, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. फुलकोबीमध्ये 'कोलीन' नावाचा एक महत्त्वाचा घटक असतो, जो मेंदूच्या विकासासाठी आणि स्मरणशक्ती सुधारण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, यातील अँटी-ऑक्सिडंट्स शरीरातील पेशींचे नुकसान टाळतात आणि दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे जुनाट आजारांपासून संरक्षण मिळते.वजन कमी करू इच्छिणाऱ्या लोकांसाठी फुलकोबी हा एक उत्तम पर्याय आहे, कारण यात कॅलरीज कमी आणि पाण्याचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे दीर्घकाळ पोट भरलेले राहते. पचनसंस्थेच्या आरोग्यासाठी फुलकोबी खाणे खूप फायदेशीर ठरते. यातील फायबरमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते. फुलकोबीमध्ये असलेले 'सल्फोराफेन' सारखे घटक कर्करोगाच्या (विशेषतः कोलन आणि प्रोस्टेट कॅन्सर) पेशींची वाढ रोखण्यास मदत करतात असे काही अभ्यासांतून दिसून आले आहे. याव्यतिरिक्त, हे हृदयविकाराचा धोका कमी करते आणि रक्ताभिसरण सुरळीत ठेवते. हाडे मजबूत करण्यासाठी आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यासाठी देखील फुलकोबीचे सेवन गुणकारी ठरते. संतुलित आहारात याचा समावेश केल्यास शरीराला आवश्यक असलेली खनिजे आणि जीवनसत्त्वे सहज प्राप्त होतात.

कोबी नेहमी बाजारातून किंवा गाडीतून खरेदी केली पाहिजे ज्याची फुले एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. अशा कोबीमध्ये जंत होण्याची शक्यता खूप कमी असते. तसेच कोबीच्या फुलांच्या दरम्यान अगदी रिकामी जागा दिसली किंवा विखुरलेली दिसली तर त्यात किडे असू शकतात. अशी कोबी खरेदी करणे टाळावे.कोबी खरेदी करण्यापूर्वी, आपण ते उलटले पाहिजे आणि देठ तपासले पाहिजे. देठात पोकळ किंवा छिद्र दिसले तर त्यात किडे असू शकतात हे समजून घ्या. असा कोबी अजिबात खरेदी करू नये. जर कोबीची पाने खूप कोमेजलेली किंवा पिवळी दिसत असतील तर अळी कोबीमध्ये शिरली असण्याची शक्यता असते. त्याच वेळी, कोबीच्या पानांमध्ये कीटकांची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते जी खूप ताजी असतात आणि खोडाला जोडलेली असतात. दुधासारख्या पांढऱ्या रंगाचा कोबी नेहमी खरेदी केला पाहिजे, अशी फुलकोबी ताजी असते आणि किडे नसतात. त्याच वेळी, जर त्यावर काळे डाग दिसत असतील तर असे होऊ शकते की बुरशी आत दिसू लागली आहे. तसेच कीटकही आत शिरले आहेत. अशी कोबी खरेदी करणे टाळले पाहिजे.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषदेची जम्बो कार्यकारणी जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**तालुकाध्यक्ष धीरज जंगले, शहराध्यक्ष किरण धोंड, तालुका कार्याध्यक्ष आत्मलिंग शेटे, तर तालुका सचिवपदी दिगंबर देशमुख, शहर सचिवपदी माणिक कोकाटे, तालुका सहकोषाध्यक्षपदी गणेश आदोडे, तालुका उपाध्यक्षपदी अनिल गायकवाड, तालुका कोषाध्यक्षपदी संदीप मस्के, शहर कार्याध्यक्षपदी अनंत कुलकर्णी, शहर उपाध्यक्षपदी अभिमान मस्के आदींची निवड.**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही पत्रकारांची मातृसंस्था म्हणून ओळखली जाते. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तसेच विभागीय संघटक सुभाष चौरे, विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, गजानन मुडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली परळी तालुक्याची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात सर्वानुमते परळी तालुका अध्यक्षपदी धीरज जंगले, शहराध्यक्षपदी किरण धोंड, तालुका कार्याध्यक्षपदी आत्मलिंग शेटे तर सचिवपदी दिगंबर देशमुख यांची निवड करण्यात आली. पत्रकार संघाच्या वतीने दि.६ जानेवारी २०२६ रोजी दर्पण दिन परळी शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

परळी शहर तालुक्यातील पत्रकारांची बैठक ज्येष्ठ पत्रकार परळी प्रहार चे मुख्य संपादक राजेशजी साबणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न परळी पत्रकार संघाची कार्यकारणी निवडण्याबाबत चर्चा झाली. या बैठकीत सर्वानुमते कार्यकारणी निवडण्यात आली आहे.

परळी तालुका अध्यक्षपदी धीरज जंगले (दैनिक चंपावतीपत्र, तालुका प्रतिनिधी), शहराध्यक्ष किरण धोंड, (दैनिक प्रजापत्र), तालुका कार्याध्यक्षपदी आत्मलिंग शेटे (मुख्य संपादक परळी समाचार), तालुका उपाध्यक्ष अनिल गायकवाड (दैनिक मराठवाडा साथी), तालुका सचिवपदी दिगंबर देशमुख (दैनिक सकाळ सिरसाळा प्रतिनिधी), तालुका कोषाध्यक्षपदी संदीप मस्के (दैनिक देवगिरी वृत्त) तालुका सहकोषाध्यक्ष गणेश आदोडे (दैनिक बीड सरकार), परळी शहर उपाध्यक्ष अभिमान मस्के (मुख्य



संपादक दैनिक उपेक्षितांचा आधार), शहर सचिवपदी माणिक कोकाटे (दैनिक किसान), शहर कोषाध्यक्षपदी संतोष बारटक्के (दैनिक लोकप्रश्न), परळी शहर कार्याध्यक्ष अनंत कुलकर्णी (मुख्य संपादक परळी संचार), प्रसिद्धी प्रमुखपदी: अभिमन्यू फड (दैनिक लोकपत्र), गोपाल सोनी (संपादक दैनिक न्याय टाइम्स), निवृत्ती खटिंग (संपादक साप्ताहिक शेतकरी परिसंवाद), कुंडलिक लहाने (दैनिक पुण्यनगरी सिरसाळा), कैलास डुमणे (संपादक रणधुमाळी), पृथ्वीराज मस्के (दै.उपेक्षितांचा आधार), मार्गदर्शक व सल्लागारपदी राजेश साबणे (मुख्यसंपादक दैनिक परळी प्रहार), प्रकाश सूर्यकर (मुख्य संपादक दैनिक दिव्यअग्नि), रामप्रसाद शर्मा (दैनिक पार्श्वभूमी परळी तालुका प्रतिनिधी), प्रा.राजू कोकलगावे (दैनिक लोकमत टाइम्स परळी तालुका प्रतिनिधी), प्रा.प्रवीण फुटके (दैनिक सकाळ परळी तालुका प्रतिनिधी), जगदीश शिंदे (दैनिक गावकरी, बीड संकेत परळी तालुका प्रतिनिधी), बालकिशन सोनी (मुख्य संपादक दैनिक न्याय टाइम्स), सुरज बियाणी (संपादक मराठवाडा साथी) तर कार्यकारणी सदस्यपदी:- विजय रोडे (उपसंपादक दैनिक लोकनेता), संजय क्षीरसागर (दैनिक मराठवाडा साथी), रमेश लहाने (दैनिक झुंजार नेता सिरसाळा), अनिल देशमुख (दैनिक दिव्य मराठी सिरसाळा), दत्ता शिवगण (सा.परळी नगरी), नरसिंग अन्नदास (दैनिक अंबाजोगाई वार्ता), कैलास बजाज (दै. मराठवाडा साथी), विश्वजीत मस्के, बालासाहेब लोभे (दै.रयतेचा आधार) आदींची निवड करण्यात आली आहे.

**दर्पण दिन व मूकनायक दिन कार्यक्रमाचे आयोजन**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार संघाच्या वतीने दि.६ जानेवारी २०२६ रोजी दर्पण दिन व ३१ जानेवारी २०२६ रोजी मूकनायक दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात प्रिंटमीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## गेवराईच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीला सर्वांना सोबत घेवून चालना देणार-नगराध्यक्ष गीताभाभी पवार

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गेवराई हा सांस्कृतिक चळवळ जोपासणारा तालुका आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगती हे शहराचे संस्कार दाखवत असतात. त्यामुळे येणाऱ्या काळात शहराच्या विकासासह येथील सांस्कृतिक चळवळीला चालना देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील असा विश्वास नूतन नगराध्यक्ष सौ गीताभाभी बाळराजे पवार यांनी व्यक्त केला आहे.



बीड जिल्ह्यातील गेवराई नगरीच्या प्रथम नागरिक, नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ गीताभाभी बाळराजे पवार यांची नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कलाविष्कार प्रतिष्ठानच्या वतीने कार्यवाहक दिनकर शिंदे आणि सचिव सौ आशाताई शिंदे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृदयसत्कार केला. यावेळी नगराध्यक्ष सौ गीता भाभी पवार यांनी शहराचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी कलाविष्कार प्रतिष्ठानने केलेल्या कार्याचे कौतुक केले. शहरात रस्ते, नाल्या, लाईट, पाणी या विकासात्मक कामासोबतच येथील कला, क्रीडा, आरोग्य आणि सांस्कृतिक चळवळही महत्वाची असते. आज पर्यंत गेवराई शहरात अनेक संस्था आणि खेळाडू कलावंतांनी ही भूमिका यशस्वीपणे पार पाडली. यातच कलाविष्कार प्रतिष्ठानने सातत्याने विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून येथील भूमिपुत्रांना नेहमीच संधी दिली ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. यापुढेही या सांस्कृतिक चळवळीला अधिक गतीने चालना देण्यासाठी माझे प्रयत्न राहतील. गेवराई शहराचा विकास आणि सामाजिक एकोपा राखण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे नगराध्यक्ष सौ गीताभाभी पवार यांनी स्पष्ट सांगितले. गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित आणि त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यासोबतच, माजी आ लक्ष्मणराव पवार, बाळराजे दादा पवार आणि गेवराईकरांनी भरभरून साथ दिल्याने ५ हजार पेक्षा अधिक मतांनी आपण विजयी झाल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.

## कोठली येथे ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना



दैनिक वादळ वार्ता

कोठली ता.शहादा येथे लोकमान्य टिळक ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली असून नुकत्याच पार पडलेल्या सभेत गुलाब तोताराम पाटील यांची अध्यक्षपदी, आसाराम माळी यांची उपाध्यक्षपदी तर सूरतापसिंग गिरासे यांची सचिवपदी तर रामसिंग जतनसिंग गिरासे यांची खजिनदार पदी निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरवातीस ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक स्व.कृष्णकांत भट यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच पसायदान गीत गायनाने सुरवात करण्यात आली.

कोठली गावात ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करणे, ज्येष्ठांना भेडसावणाऱ्या आरोग्य समस्यावर मार्ग काढणे तसेच ज्येष्ठांच्या विकासासाठी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी वडाळी येथे ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रताप चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. तसेच वाचन चळवळीचे कार्यकर्त प्रवीण महाजन यांनी ज्येष्ठांसाठी वाचनालय, आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर तसेच शासनाच्या ज्येष्ठांसाठी असलेल्या विविध योजनाचा लाभ याबाबत मार्गदर्शन केले. शिबिरे, प्रसंगी सभेत जिल्हा संघटक के. डी. गिरासे, फेस येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मणिलाल भाई चौधरी यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. गावात ज्येष्ठ नागरिक भवन बांधकामासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी नूतन अध्यक्षांनी जाहीर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आसाराम माळी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वितेसाठी अरुणबापू पाटील, महेंद्र जगताप, सुरेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

## चौसाळा शाळेच्या अंगणात पुन्हा अवतरले बालपण १९९१-९२ बॅचचा ऐतिहासिक स्नेहमेळावा

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

वेळ कधीच थांबत नाही, पण काही क्षण मात्र आयुष्याच्या पाटीवर कायमचे कोरले जातात. असाच एक अविस्मरणीय सोहळा २८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद शाळा, चौसाळा येथे संपन्न झाला. १९९१-९२ च्या १० वीच्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी तब्बल ३४ वर्षांनंतर एकत्र येत आपल्या शालेय स्मृतींना उजाळा दिला.



शाळा सुटल्यानंतर प्रत्येक जण आपल्या संसाराच्या आणि करिअरच्या व्यापात गुंतला होता. मात्र, आपल्या जुन्या सवंगड्यांना पुन्हा भेटावे, ही ओढ सर्वांना स्वस्थ बसू देत नव्हती. या बॅचच्या काही पुढाकारी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून प्रत्येकाचा शोध घेतला. सोशल मीडियाच्या माध्यमातून एक साखळी तयार केली आणि बघता बघता सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी एका छताखाली जमले. चौसाळा शाळेचे तेच मैदान आणि तोच परिसर पुन्हा एकदा जुन्या मित्रांच्या हास्याने दुमदुमून गेला. या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे आपल्या लाडक्या गुरुजनांची उपस्थिती. आयुष्याच्या कठीण वळणावर आपल्याला दिशा दाखवणाऱ्या आपल्या शिक्षकांना विद्यार्थ्यांनी मोठ्या आदराने निमंत्रित केले होते. आपल्या जुन्या विद्यार्थ्यांना आज विविध क्षेत्रांत यशस्वी झालेले पाहून शिक्षकांचे चेहरेही अभिमानाने उजळले होते. यावेळी सर्व गुरुजनांचा यथोचित सत्कार करून विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. शाळेतील मधल्या सुट्टीतील गमती, शिक्षकांचा धाक आणि मैदानावरचे खेळ यावर चर्चा रंगली. अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटल्यामुळे अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील चढ-उतार आणि यशाची गाथा मांडली. शालेय जीवनातील डब्याची आठवण करून देणारे स्नेहभोजन सर्वांनी एकत्रित घेतले. जुन्या आठवणी कायमस्वरूपी जतन करण्यासाठी अनेक छायाचित्रे काढण्यात आली. शिक्षण संपले तरी नाती संपत नाहीत, हे आज चौसाळा शाळेच्या या माजी विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. पुढील वाटचाल केवळ भेटून न थांबता, आपल्या शाळेसाठी आणि समाजासाठी काहीतरी विधायक कार्य करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. या स्नेहमिलनामुळे सर्वांच्या नात्यात एक नवी ऊब निर्माण झाली आहे. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले, त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. 'पुन्हा भेटूया' या आणाभाका घेत आणि जुन्या आठवणींची शिदोरी सोबत घेऊन हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात संपन्न झाला.

## शासनाने लोहा तालुक्यातील गेल्या वर्षभरापासून रखडलेल्या शिवरस्ते ,पांदन रस्ते सीसी रस्त्यांचा कामांना तात्काळ मंजुरी व निधी देऊन कामे सुरू करावी-अण्णाराव पाटील पवार

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शासनाने लोहा तालुक्यात गेल्या वर्षभरापासून रखडलेल्या शिवरस्ते, पांदन रस्ते, सीसी रस्ते आदी कामांना तात्काळ मंजुरी व निधी देऊन कामे सुरू करावी अशी मागणी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सायाळ- भाद्रा ग्रामपंचायतीचे सरपंच अण्णाराव पाटील पवार यांनी केली आहे.

पुढे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सायाळ-भाद्रा ग्रामपंचायतीचे सरपंच आण्णाराव पाटील पवार यांनी असे नमूद केले की गेल्या वर्षाभरापासुन लोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध विकास कामे निधी अभावी ठप्प झाले आहेत.

शिवरस्ते , पांदन रस्ते हे रोजगार हमी योजनेअंतर्गत होत होते त्यामुळे गावातील गोरगरीब मजुराच्या हातात गावातच मजुराच्या हाताला रोजगार उपलब्ध होतो व गावाचा विकास ही होतो पण रोजगार हमी योजनेतुन होणारे शिवरस्ते व पांदन रस्त्यामुळे शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना दळणवळणाची सोय होते. तसेच आरसीसी रस्ते,नाली , ९०/१० हेड खालील कामे ही



निधी अभावी व प्रशासकीय मंजुरी अभावी बंद आहेत.

तेव्हा शासनाने याकडे तात्काळ लक्ष देऊन लोहा तालुक्यातील गेल्या वर्षभरापासून रखडलेल्या शिवरस्ते, पांदन रस्ते, सीसी रस्ते आदी विविध विकास कामांना तात्काळ निधी व मंजुरी द्यावी अशी मागणी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सायाळ -भाद्रा ग्रामपंचायतीचे सरपंच आण्णाराव पाटील पवार यांनी केली आहे.

# नवापुरात हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा;१४ लाखांचा मुद्देमाल जप्त,३९ आरोपी जाळ्यात!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर ते सुरत महामार्गालगत सुरू असलेल्या एका मोठ्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १४ लाख ३६ हजार ६०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, गुजरातसह इतर राज्यांतील तब्बल ३९ जुगारींना बेड्या ठोकल्या आहेत. नवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'गुडलक टायर सर्विस सेंटर'च्या पाठीमागे असलेल्या एका बंदिस्त पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीरपणे 'झन्ना-मन्ना' नावाचा जुगार खेळला जात असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तातडीने पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले.



**फिल्मी स्टाईलने छापा:-** २९ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला. तेव्हा तेथे काही इसम जमिनीवर, तर काही टेबलाभोवती खुर्च्यांवर बसून मोठ्या रकमा लावून जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे जुगारींची एकच पळापळ झाली, मात्र पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेतले.

**जुगाराचे गुजरात कनेक्शन:-** अटक करण्यात आलेल्या ३९ आरोपींमध्ये बहुतांश लोक हे गुजरात राज्यातील सुरत, बडोदा, नवसारी, वापी आणि भरुच येथील रहिवासी आहेत. तसेच काही आरोपी उत्तर प्रदेशातील आहेत. नवापूर येथील रईस नावाचा इसम हा अड्डा चालवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या कारवाईत पोलिसांनी रोकड रक्कम,महागडे मोबाईल फोन,जुगारासाठी वापरलेली वाहने जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल जप्त केला आहे.

सर्व आरोपींविरुद्ध नवापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउपनि मुकेश पवार, विकास गुंजाळ, विजय सोनवणे, मुकेश तावडे, विशाल नागरे, ज्ञानेश्वर पाटील, अभय राजपुत, राजेंद्र काटके, सतिष घुले, राहुल तडवी आणि पवन पाटील यांच्या पथकाने केली आहे.

# धडगाव तालुक्यातील तलाई आश्रमशाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाने जिल्हा हादरला

## आरोपीला तात्काळ अटक करण्यासाठी युवा क्रांतीचे जिल्हाभर निवेदन आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील तलाई येथील शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या अत्यंत गंभीर, अमानवी व संतापजनक लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण व संरक्षणासाठी उभारलेल्या शासकीय आश्रमशाळेतच असा प्रकार घडणे ही अत्यंत गंभीर बाब असून, समाजाच्या नैतिकतेला काळीमा फासणारी घटना असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

फिर्यादीनुसार आरोपी हा जबाबदारीच्या व विश्वासाच्या पदावर कार्यरत असून त्याने अल्पवयीन विद्यार्थिनीवर वारंवार बळजबरीने लैंगिक अत्याचार केले, तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देऊन दीर्घकाळ तिला मानसिक गुलामगिरीत ठेवले. भीती, लाज व मानसिक दबावामुळे पीडितेने हा प्रकार बराच काळ कोणालाही सांगितला नाही. मात्र त्रास असह्य झाल्यानंतर अखेर कुटुंबीयांना माहिती दिल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. सदर गुन्हा झजउडज कायद्यांतर्गत अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून आरोपी मोकळा राहिल्यास पुरावे नष्ट होणे, साक्षीदारांवर दबाव टाकणे व पीडितेला पुन्हा त्रास देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर युवा क्रांती नंदुरबार च्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलनात्मक भूमिका घेत प्रत्येक तालुक्यात पोलीस प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी स्पष्ट व ठाम मागणी या निवेदनांमधून करण्यात आली.

धडगाव येथे तालुकाध्यक्ष लक्ष्मण पाडवी यांच्या नेतृत्वाखाली धडगाव पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले, तर शहादा येथे जिल्हा उपप्रमुख इंजि. गणेश पवार तसेच तालुकाध्यक्ष मनोज वसावे यांच्या नेतृत्वाखाली शहादा पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले. यासह जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही पोलीस अधिकाऱ्यांना निवेदने देऊन आरोपीविरोधात तातडीने कठोर पावले उचलण्याची मागणी करण्यात आली.

या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन प्रदेश अध्यक्ष युवक क्रांती नंदुरबार ड.रुपसिंग वसावे, प्रदेश प्रवक्ते ड.संग्राम पाडवी, इंजि. राकेश पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच इंजि. संदीप वळवी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा प्रश्न केवळ एका पीडित विद्यार्थिनीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण आश्रमशाळा व्यवस्थेतील मुलींच्या सुरक्षिततेशी



निगडित आहे.

युवा क्रांतीच्या वतीने जिल्ह्यातील सर्व वकील संघटनांनाही भावनिक व नैतिक आवाहन करण्यात आले असून, धडगाव तालुक्यातील तलाई आश्रमशाळेतील या अमानवी गुन्ह्यातील आरोपीची बाजू कोणत्याही वकीलाने घेऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांत आरोपीला सामाजिक व नैतिक संरक्षण मिळणे हे भविष्यातील गुन्ह्यांना खतपाणी घालणारे ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला की, जर आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर युवा क्रांती नंदुरबारच्या वतीने जिल्हास्तरावर अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल. प्रशासनाने या प्रकरणाची अत्यंत संवेदनशीलतेने दखल घेऊन पीडितेला न्याय देण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

# पंतप्रधान आवास योजनेत लाचखोरीचा गंभीर आरोप; चौकशी करूनही अहवाल गायब!

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

खडकमांजरी ता.लोहा येथील ग्रामसेवकांवर २०० रुपये प्रति लाभार्थी वसुलीचा आरोप, पंचायत समितीची दिरंगाई संशयास्पद लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथील पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत घरकुलासाठी पात्र कुटुंबांचा सेल्फ सर्वे करताना प्रति लाभार्थी २०० रुपये बेकायदेशीर वसुली केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत अधिकारी/ग्रामसेवकांवर करण्यात आला आहे. या प्रकरणी मुंजाजी पंडित कापसे यांनी लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज सादर करून चौकशीची मागणी केली होती.

तक्रारीची दखल घेत दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी गटविकास अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी विस्तार अधिकारी (पंचायत) श्री. मेहेत्री एम.एस. यांच्याकडे सोपवली होती. मात्र, प्रत्यक्ष चौकशी दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी झाली असून, या चौकशीदरम्यान **अर्जदार उपस्थित असताना संबंधित ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) आय.एम.सय्यद.हे अनुपस्थित होते, ही बाब गंभीर मानली जात आहे.विशेष म्हणजे, ग्रामसेवक गैरहजर असतानाही चौकशी थेट ग्रामपंचायत कार्यालयात बसून पार पाडण्यात आल्याचा आरोप आहे. चौकशीदरम्यान श्री. मेहेत्री.एम.एस. यांनी तोंडी स्वरूपात, ज्यांच्याकडून २०० रुपये किंवा त्याहून अधिक पैसे घेतले असतील त्यांनी पंचायत समितीकडे अर्ज करावा असे सांगितले. त्यानुसार १० ते १२ पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी पंचायत समितीकडे लेखी अर्ज सादर केले, मात्र त्यानंतर ना पुढील चौकशी झाली, ना कोणालाही लेखी स्वरूपात माहिती किंवा कार्यवाहीचा पुरावा देण्यात आलातक्रारदारांकडून सातत्याने पाठपुरावा करूनही विस्तार अधिकारी श्री. मेहेत्री.एम.एस. यांच्याकडून उडवा-उडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप आहे. चौकशी झाली आहे, अहवाल सादर केला आहे, मात्र घरकुल विभागात कर्मचारी नसल्याने अहवाल थांबला आहे* असे कारण वेळोवेळी दिले जात असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. मात्र, चौकशी अहवाल नेमका कुठे आहे, तो कधी सादर झाला, आणि त्यावर काय कार्यवाही झाली – याबाबत कोणतीही लेखी माहिती देण्यात आलेली नाही हे विशेष.या प्रकरणात शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत भ्रष्टाचार, अधिकाराचा गैरवापर व जनतेची फसवणूक झाल्याचा आरोप असूनही संबंधित अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संशयाची सुई पंचायत समितीकडे वळत आहे तक्रारदारांकडे चौकशी व्हावी यासाठीचे अर्ज, ओ.सी (ऑफिस कॉपी) व अन्य पुरावे असल्याचेही सांगण्यात आले आहे.या संपूर्ण प्रकारामुळे चौकशी फक्त कागदावरच झाली का ?लाचखोरीवर पांघरूण घातले जात आहे का? असे प्रश्न उपस्थित होत असून, चौकशी अहवाल तात्काळ जाहीर करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पुण्यात शिवसेनेला २५ जागा मिळाव्यात–डॉ.नीलम गोऱ्हे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने शिवसेनेला किमान २५ जागा द्याव्यात, अशी मागणी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकांमधील विजयाच्या आकडेवारीनुसार शिवसेनेला सरासरी ४७ जागा मिळणे अपेक्षित होते, मात्र सध्या २५ जागांची मागणी करण्यात आली आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. आगामी मनपा निवडणुकीसाठी भाजपसोबत युती करण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे.

या संदर्भात, मंत्री उदय सामंत यांनी काल रात्री भाजपला २५ वॉर्डांची यादी सादर केली आहे. या यादीवर भाजपने विचार करावा, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विजय शिवतारे यांच्याशी चर्चा केली असून, ते उदय सामंत यांच्याशीही बोलणार आहेत. वॉर्डनिहाय यादीबाबत शिवतारे, धांगेकर, अजय भोसले आणि आबा बागुल यांच्यासोबत बैठक झाली आहे. या सर्व घडामोडींवर पक्षप्रमुख एकनाथ शिंदे अंतिम निर्णय घेतील.डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, नाना भानगिरे हे त्यांच्या खासगी कामामुळे बैठकीतून लवकर निघून गेले होते आणि त्यांच्यात कोणतेही राजकीय मतभेद नाहीत. पक्षाच्या शिस्तीनुसारच सर्व कामकाज सुरू आहे. काही कार्यकर्त्यांची स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची मागणी असली तरी, हा निर्णय आपल्या हातात नसल्याचे त्यांनी सांगितले.राज्यात महायुतीबाबत ठिकठिकाणी चर्चा सुरू असून, पुण्यात इतर पर्याय काय असतील, याबाबत सध्या काही सांगता येणार नाही. शिवसेना आपले संघटन मजबूत असलेल्या आणि प्रबळ उमेदवार असलेल्या जागांवर निवडणूक लढवणार आहे. पक्षाने स्वतःचा सर्व्हे देखील केला आहे. युती चर्चेला वेळ लागला म्हणजे अन्याय झाला असे होत नाही, असेही त्यांनी नमूद केले. कार्यकर्त्यांनी पक्षाचे नियम आणि शिस्त पाळावी, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले.

# लोहा शहरात भीषण आग; तीन दुकाने जळून खाक, कोट्यवधींचे नुकसान

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा शहरात दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास भीषण आगीची घटना घडली. शहरातील इंदिराई ट्रेडर्स, वैष्णवी बॉडी बिल्डर्स आणि शिवकाशी वेल्डिंग वर्कशॉप ही तीन व्यावसायिक दुकाने आगीत पूर्णतः जळून खाक झाली. या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, विशेषतः सतिष अशोकराव शेट्टे यांच्या इंदिराई ट्रेडर्स या दुकानाचे **सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे.प्राप्त माहितीनुसार, दुकानाच्या बाजूला असलेल्या वीज वितरणाच्या खांबाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने वीजपुरवठ्यात शॉर्ट सर्किट झाले आणि त्यातून ही भीषण आग लागल्याचे प्राथमिक कारण समोर येत आहे. आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केल्याने व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संबंधित व्यापारी व त्यांच्या कुटुंबीयांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे.



घटनेची माहिती मिळताच लोहा कंधार चे तालुक्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज घटनास्थळी भेट देऊन जळालेल्या दुकानांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करून बाधित व्यापाऱ्यांना शासकीय मदत व भरपाई मिळवून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या पाहणी दरम्यान नगराध्यक्ष शरद पवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, नगरसेवक केशवराव मुकदम, भास्कर पवार, सदाशिव तेलंग, मारोती जंगले तसेच महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.दरम्यान, आगीत बाधित सर्व व्यापारी बंधू व नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची जोरदार मागणी केली आहे. शासनाने या गंभीर घटनेची दखल घेऊन पीडित व्यापाऱ्यांना न्याय देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जिल्ह्यात पहिल्यांदाच फक्त २ दिवसांच्या,१.५ किलो वजनाच्या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया

## श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालिटी हॉस्पिटल मधे आता नवजात व बाल शस्त्रक्रिया विभाग देखील सुरू

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरणाऱ्या एका ऐतिहासिक वैद्यकीय यशामध्ये, फक्त २ दिवसांचे, १.५ किलो वजनाचे अकाली (प्रीटर्म) बाळ यांच्यावर ॲनोरेक्टल मालफॉर्मेशन (गुदद्वार न उघडणे) या गंभीर जन्मजात आजारावर बीडमध्ये प्रथमच यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया बीड शहरातील श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय विश्राम गृह शेजारी, नगर रोड बीड येथे पार पडली. या रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. एकनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही अतिशय गुंतागुंतीची व नाजूक बालशस्त्रक्रिया प्रसिद्ध बालशल्यचिकित्सक एमसीएच सर्जन डॉ. नागेश उंदरे यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. शस्त्रक्रियेदरम्यान सुरक्षित व दक्ष भूल व्यवस्थापन भूलतज्ज्ञ डॉ. तुकाराम बडे यांनी केले. यावेळी या रुग्णालयातील आरएमओ डॉ. झिशान मोमीन, ओटी तंत्रज्ञ दयानंद राठोड, शिवाजी वांडरे, राम मंदे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

बाळाची शस्त्रक्रियेनंतर प्रकृती स्थिर असून समाधानकारक सुधारणा होत आहे. अधिक उपचारांसाठी बाळाला याच रुग्णालयाच्या NICU मध्ये भरती केले आहे. ही कामगिरी वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र कौतुकास्पद ठरत असून, बीडच्या आरोग्यसेवेसाठी हा एक अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.बीड जिल्ह्यात अद्ययावत व प्रगत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालिटी हॉस्पिटल ओळखले जाते. या रुग्णालयात कर्करोग , किडनी,



हृदयरोग व कॅथलॅब, नेत्ररोग, कान नाक घसा, जॉइंट रिप्लेसमेंट, मणक्यांचे आजार, छातीरोग, अशा विविध एक ना अनेक आजारावर उपचार व शस्त्रक्रिया आधीपासूनच विविध शासकीय योजनेतून मोफत करण्यात येत आहेत. आता नवजात व बाळांसाठी शस्त्रक्रिया विभाग सुरू करून त्यासाठी आवश्यक सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता बाल शक्यचिकित्सक व त्या साठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध झाल्यामुळे, बीड व आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णांना छ. संभाजीनगर, पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांकडे जाण्याची आवश्यकता राहिलेली नाही. विशेष म्हणजे, ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (MJPJAY) अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली, ह्यासाठी खाजगी रुग्णालयात यासाठी ३ ते ४ लाख रुपयाचा खर्च लागतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही उच्च दर्जाच्या उपचारांचा लाभ श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालीटी हॉस्पिटल च्या माध्यमातून बीड शहरातच अगदी मोफत मिळणार आहे.

# आंगनवाडी सेविकांच्या हक्कांसाठी राष्ट्रव्यापी पत्र व ज्ञापन आंदोलन, भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शांत प्रकाशजी जाटव

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

देशातील आंगनवाडी सेविकांना श्रमिक म्हणून वैधानिक मान्यता,किमान वेतन,सामाजिक सुरक्षा व पेन्शन यांसारखे मूलभूत हक्क मिळावेत,या मागणीसाठी दि.३१ डिसेंबर २०२५ पासून भारतीय जनता मज़दूर संघ यांच्या वतीने राष्ट्रव्यापी पत्र व ज्ञापन आंदोलन आयोजित करण्यात येणार आहे.हा उपक्रम औपचारिक किंवा प्रतीकात्मक नसून, संविधानिक अधिकार आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठीचा गंभीर लोकशाही प्रयत्न असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.देशभरातील सुमारे २७ लाख आंगनवाडी सेविका गेल्या अनेक दशकांपासून माता –बालकपोषण,सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक कल्याणाची जबाबदारी सातत्याने पार पाडत आहेत.मात्रआजही त्यांना श्रमिक दर्जा,किमान वेतन तसेच सामाजिक सुरक्षे पासून वंचित ठेवण्यात येत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.सर्वोच्च न्यायालयाने दीर्घकाळ नियमित व नियंत्रित स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ मानधनधारक स्वयंसेवक न मानता श्रमिक म्हणून मान्यता देण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली असताना ही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शांत प्रकाश जाटव यांनी सांगितले की,या



प्रश्नांच्या निराकरणाची अपेक्षा सध्याच्या सरकारकडूनच असून,संघर्षाची भूमिका न घेता संविधानिक व संवाद आधारित मार्गाने हा पत्र आंदोलन राबविण्यात येत आहे.या आंदोलनाअंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय,श्रम व रोजगार मंत्रालय,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच माननीय पंतप्रधान यांना पत्र व ज्ञापन सादर करण्यात येणार आहेत. दबाव निर्माण करणे हा उद्देश नसून,धोरण,कायदा आणि प्रत्यक्ष परिस्थिती तील तफावत अधोरेखित करून सर्वोच्च न्यायालया च्या निर्देशांनुसार श्रम- सन्मान सुनिश्चित करण्या साठी सकारात्मक पावले उचलली जावीत,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, देशातील बौद्धिक वर्ग, शिक्षणतज्ज्ञ,धोरण विशेष तज्ञ आणि विचारवंत नागरिकांनी याविषयाकडे भावनिक नव्हे तर कायदेशीर,संविधानिक व नीतिगत दृष्टिकोनातून पाहून न्याय्य तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्रातही हे अभियान राबविण्यात येत असुन तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे.तरी सर्व अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस यांनी निवेदन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077